जावक क्र. २८६/२४
जिल्हा न्यायालय, वाशिम
दिनांक 9/0/6/24

वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

-: निविदा मागविणेबाबत :-

विषय : नष्टीकरण केलेली कात्रण न केलेली रद्दी विकणेकरिता निविदा मागविण्याबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, जिल्हा अभिलेखागृह, वाशिम येथील कार्यालयीन कात्रण न केलेली रद्दी विकत घेणेकरिता खालील अटी व शर्तींवर निविदा मागविण्यात येत आहेत.

१. निविदा धारकाने कार्यालयीन रद्दी विकत घेण्याकरिता आपली निविदा सर्व कर, किंमती व अटीसह **दिनांक १९/०७/२०२४ रोजी किंवा तत्पूर्वी** बंद लिफाफ्यामध्ये वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांच्या नावे या कार्यालयास सादर करावयात. तसेच बंद लिफाफ्यावर **'रद्दी विकत घेण्याकरिता निविदा'** असे ठळक अक्षरात नमुद करावे.

२. सदर निविदेमध्ये दर्शविलेल्या कात्रण न केलेल्या रद्दीचा भाव हा **कमीत कमी प्रति किलो १३/- (तेरा) रूपये** ठरविण्यात आलेला आहे.

३. संपुर्ण रद्दीची किंमत/रक्कम एकमुस्त दयावी लागेल.

४. ज्या खरेदीदाराची निविदा मंजूर होईल त्यांनी स्वखर्चाने रद्दी मोजून घेण्याकरिता इलेक्ट्रानिक मॅट्रीक वजन काटा व सर्व रद्दी भरण्याकरिता पोत्याची व्यवस्था करून रद्दी घेवून नेण्याची व्यवस्था करावी.

५. निविदाधारकास निविदा मंजूर झाल्याचे कळल्यापासून रद्दी तीन दिवसाचे आंत किंवा वाढविलेल्या मुदतीचे आंत उचलून न्यावी लागेल. तसे न केल्यास नविन निविदा पुन्हा बोलविण्यात येईल, असे करतांना सरकारला जे काही नुकसान होईल ते प्रथम ज्याची निविदा मंजूर झाली होती व ज्याने माल उचलून नेला नाही त्याची अनामत रक्कम सरकार जप्त करण्यात येईल व झालेल्या नुकसानीची रक्कम त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

६. कोणतीही निविदा कारण न दाखवता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

७. निविदा भरतांना सुरक्षा निधी म्हणून **रूपये २०००/- चा धनाकर्ष (Bank Draft)** अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नावाने असावा.

८. निविदा धारकाने निविदा सादर करतांना बंद लिफाफ्यामध्ये त्यांचे स्वतःचे छायाचित्र असलेले आधार कार्ड/पॅनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना इत्यादिची स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडणे व स्वतःचा मोबाईल कमांक नमूद करणे आवश्यक आहे.

९. निविदा मंजूरीनंतर संबंधीत निविदा धारकाने रद्दीचे मोजमाप करण्यापूर्वी या कार्यालयास **रूपये १५०००/-** ची अनामत रक्कम भरणे बंधनकारक राहील.

सहायक अधिक्षक	अधिक्षक (न्यायीक)	अधिक्षक
जिल्हा अभिलेखागृह,	जिल्हा अभिलेखागृह	वित्त विभाग
जिल्हा न्यायालय, वाशिम	जिल्हा न्यायालय, वाशिम	जिल्हा न्यायालय, वाशिम

वाशिम.
दिनांक : १०/०७/२०२५

<u>प्रतिलिपी</u> :

१. जिल्हा न्यायालय, वाशिम येथील सुचना फलकावर.
२. जिल्हा न्यायालय, वाशिम या कार्यालयाचे संकेतस्थळावर.
३. वि. जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथील सुचना फलकावर.
४. वि. तहसिल कार्यालय, वाशिम येथील सुचना फलकावर.

Approved
10/7/25